**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **देशाच्या प्रगतीसाठी स्वतःला समर्पित करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं देशवासियांना आवाहन.**
2. **सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त राज्यासह देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
3. **शेतरस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांसंबंधी वादांमध्ये तहसीलदारांनी दिलेल्या आदेशांची सात दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे बंधनकारक.**
4. **भारत आणि ऑस्ट्रेलियातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून विजय.**

**एकता दिवस-राष्ट्रीय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना एकजूट होऊन देशाच्या प्रगतीसाठी स्वतःला समर्पित करण्याचं आवाहन केलं आहे. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी नागरिकांनी स्वतःला समर्पित करावं, असं ते म्हणाले. देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त एकता नगर इथं आयोजित राष्ट्रीय एकता दिवस समारंभाला पंतप्रधानांनी आज संबोधित केलं. आज देशानं एकात्मतेची शपथ घेतली असून देशाच्या एकतेला मजबूती देण्याचा संकल्प केल्याचं पंतप्रधान म्हणाले.

***आज करोड़ों लोगों ने एकता की शपथ ली है। हमने संकल्प लिया है कि हम ऐसे कार्यों को बढ़ावा देंगे जो देश की एकता को मजबूती दे। यहाँ एकता नगर में ही एकता मॉल, एकता गार्डन, एकता के सूत्र को सशक्त करते दिखते।***

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात सर्व भारतीय भाषांना प्रोत्साहन आणि संवर्धन करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार यावेळी केला. तत्पूर्वी, एकता नगर इथं आज भव्य एकता दिवस संचलन करण्यात आलं.

**'सरदार @150 युनिटी मार्च'- विदर्भ**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती यांसह अनेक मान्यवरांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. लोह पुरुष आणि भारताचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंती निमित्त आज देशभरात 'सरदार@150 युनिटी मार्च' चं आयोजन करण्यात आलं. यवतमाळ मध्ये अमोलकचंद महाविद्यालय येथून पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेत जिल्हाधिकारी,पोलीस अधीक्षक यांसह प्रशासकीय अधिकारी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिक सहभागी झाले. वर्धा जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं वॉकेथॉनचं आयोजन करण्यात आलं. या उपक्रमात ३ हजार नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

१२ वर्षांपासून ७५ वर्षांपर्यंतच्या नागरिकांसह दिव्यांग बांधवांचाही सहभाग दिसून आला. बुलढाण्यातील मलकापूर इथं देखील भव्य एकता रॅलीचं आयोजन करण्यात आलं. केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या नेतृत्वाखाली जनता कॉलेज येथून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीदरम्यान त्यांनी सरदार पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहिली.

***युवामंत्रालय संपूर्ण देशभरामध्ये प्रत्येक जिल्ह्यामधे पदयात्राच आयोजन केलेलं आहे जेणेकरून सरदार वल्लभभाई पटेलांच्या आपल्या देशासाठी काम केलेल आहे. जो एकतेचा मॅसेज दिलेला आहे, ते युनिटीचा संदेश संपूर्ण देशभरातल्या लोकांना दिलेला आहे. तर त्यासाठी ही मार्च काढली जात आहे आज जस मलकापूर ला कार्यक्रम आहे तसंच देशाच्या विविध भागात मध्ये हा कार्यक्रम होतो आहे.***

वाशीम मध्ये देखील मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार द्वारा 'युनिटी मार्च' रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. नागपुरात दक्षिण पूर्व मध्य रेलवे सह सर्व सरकारी आस्थापनांमध्ये आणि विविध संस्थांद्वारा सरदार पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी विशालकुमार मेश्राम यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून अभिवादन केलं. चंद्रपूर महानगरपालिका मुख्यालय तसंच मनपा शाळांमध्ये 31 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय संकल्प व राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आली.

**दक्षता पदकं**

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दिली जाणारी ‘केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकं’ देशभरातल्या १ हजार ४६६ जणांना जाहीर झाली आहेत. कारवाई, तपास, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायवैद्यक शास्त्र या चार क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, केंद्रीय पोलीस यंत्रणांच्या कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार दिला जातो. यंदा हा पुरस्कार मिळवणाऱ्यांमध्ये राज्यातल्या नऊ जणांचा समावेश आहे.

**इंदिरा गांधी स्मृतिदिन**

देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या 41 व्या पुण्यतिथीनिमित्त देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत ‘शक्तिस्थळ’ या इंदिरा गांधींच्या समाधी स्थळी श्रद्धाजली वाहिली. नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात तसंच आकाशवाणी कार्यालयात देखील माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना अभिवादन करण्यात आलं . त्यांनी देशासाठी दिलेल्या बलिदानाचं यावेळी स्मरण करण्यात आलं.

**वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप**

वाशीम जिल्हा पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी संगीता ढोले हिने दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन येथे झालेल्या वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप 2025 मध्ये भारताचा तिरंगा जागतिक पातळीवर फडकवला. ४७ किलो वजन गटात तिने क्लासिकल पॉवरलिफ्टिंगमध्ये कांस्य आणि इक्युप पॉवरलिफ्टिंग प्रकारात सुवर्ण पदक पटकावून देशाचा गौरव वाढवला - ऐकुया संगीताचे मनोगत

***चॅम्पियनशिपमध्ये वजनगट 47 मध्ये मला ब्रांझ पदक व सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. साऊथ आफ्रिका केप टाउन या ठिकाणी चॅम्पियनशिपमध्ये ओव्हरऑल 42 कंट्री पार्टिसिपेट झाल्या होत्या आणि सदर स्पर्धक ही ४ हजार होती.***

**कर्जमाफी**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.सरकारने केवळ कर्जमाफीची आश्वासनं दिली होती परंतु महाएल्गार आंदोलनामुळे आम्ही सरकारला कर्जमाफीची घोषणा करायला तसेच निश्चित तारीख सांगायला बाध्य केल, असं मत प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केलं .काल मुंबईत मुख्यमंत्र्या सोबत झालेल्या बैठकीनंतर आज नागपूर विमानतळावर आल्यानंतर ते बोलत होते. राज्य आर्थिक संकटात असताना कर्जमाफीची घोषणा केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचे देखील आभार मानले.

**चंद्रशेखर बावनकुळे**

शेतरस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांसंबंधी वादांमध्ये तहसीलदारांनी दिलेल्या आदेशांची सात दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आता अधिकाऱ्यांसाठी बंधनकारक करण्यात आलं आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या या निर्णयाबाबत शासनानं काल परिपत्रक जारी केलं. आदेशाची अंमलबजावणी झाल्याची खात्री, स्थळपाहणी, पंचनामा आणि जिओ-टॅग छायाचित्रांच्या आधारे करावी लागणार आहे. अंमलबजावणी होईपर्यंत प्रकरण दप्तरी दाखल करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार तयार केलेल्या अभ्यास समितीच्या शिफारसींवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**विकास ठाकरे**

नागपूर महानगरपालिकेच्या नगररचना विभागात मोठा घोटाळा झाला असून, निवासी लीज भूखंडांवर अनधिकृत वाणिज्यिक आणि रुग्णालय प्रकल्पांना मंजुरी दिल्याचा

आरोप काँग्रेस नेते विकास ठाकरे यांनी केला आहे. अभियंत्यांनी भूखंडाचे क्षेत्रफळ कृत्रिमरीत्या वाढवून एफएसआयमध्ये फेरफार केल्याचही त्यांनी म्हटलं आहे. ठोस पुरावे असूनही प्रशासक यांनी दोषींना संरक्षण दिल्याचा आरोप आमदार विकास ठाकरे यांनी केला आहे.

**पुरुष क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलियातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतला दुसरा सामना आज ऑस्ट्रेलियाने ४ गडी राखून जिंकला. आज मेलबर्न इथं झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आणि भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. मात्र, भारतीय संघाची फलंदाजी चांगलीच गडगडली. भारतीय संघानं १९ षटकांत सर्व गडी गमावून केवळ १२५ धावा केल्या. भारताने दिलेलं लक्ष ऑस्ट्रेलियाने १४ षटकांत ६ गडी गमावून पूर्ण केलं. मालिकेतला पहिला सामना पावसाच्या व्यत्ययामुळे रद्द करावा लागला होता.

**हवामान**

येत्या काही तासात विदर्भातील गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

**ई-पीक पाहणी**

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये आलेली पूरसदृश परिस्थिती, अवकाळी पाऊस आणि दुबार पेरणी यामुळे खरीप हंगाम २०२५ च्या ई-पीक पाहणी नोंदणीत आलेल्या अडथळ्यांची दखल घेऊन, ई-पीक पाहणी नोंदणीला ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

*****